**<u>ठळक बातम्या</u>**

- नोंदणी केल्यावर अडीच दिवसात सिलिंडर घरपोच दिलं जात असल्याचं पेट्रोलियम मंत्रालयाचं स्पष्टीकरण,

- राज्यासमोर अडचणी असल्या तरी त्यातून मार्ग काढण्याची क्षमता राज्यात असल्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत प्रतिपादन

- जमीन मोजणीसाठी लागणारा कालावधी महिनाभरावर आणण्याचं महसूल मंत्र्यांचं आश्वासन

**आणि**

- शेअर बाजारात आज पुन्हा जोरदार घसरण, सेन्सेक्स ७७ हजाराच्या, तर निफ्टी २४ हजाराच्या खाली,

**<><><><><>**

घरगुती वापराच्या सिलिंडरची नोंदणी केल्यानंतर सरासरी अडीच दिवसांत पुरवठा सुरू आहे. त्यामुळं नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असं आवाहन पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथे पश्चिम आशियातल्या सद्यस्थितीबद्दल त्या आज संबोधित करत होत्या. सरकारने केलेल्या उपाययोजनांमुळे एलपीजीच्या उत्पादनात २५ टक्के वाढ झाली आहे, असं त्या म्हणाल्या…

**होल्ड.. बाईट - सुजाता शर्मा**

तसंच, या काळात सिलिंडरची साठेबाजी आणि काळाबाजार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल असा इशाराही शर्मा यांनी दिला. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून येणाऱ्या कच्च्या तेलाच्या आयातीपेक्षा भारतात इतर देशांमधून कच्च्या तेलाची आयात जास्त आहे. आज भारत ४० देशांमधून कच्च्या तेलाची आयात करतो

आणि तेल विपणन कंपन्यांनी ही आयात सुनिश्चित केल्याचं त्या म्हणाल्या. देशातल्या गॅस कंपन्यांनी नवीन स्रोतांकडून कच्च्या तेलाचे कार्गो खरेदी केले आहेत, अशी माहितीही शर्मा यांनी दिली.

सध्या पर्शियन आखातात २८ भारतीय जहाजं असून त्यावर ७७८ भारतीय कार्यरत आहेत. सरकार या सर्व जहाजांच्या सुरक्षिततेसाठी समन्वय साधत आहे. या जहाजांवर वैद्यकीय मदत आणि सुरक्षा सुनिश्चित करण्यात येत आहे, अशी माहिती बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी दिली.

**<><><><><>**

नीती आयोगानं आज प्रसिद्ध केलेल्या आर्थिक वर्ष २०२३-२४च्या वित्तीय आरोग्य निर्देशांकात महाराष्ट्र ४५ गुणांसह देशात पाचव्या स्थानी आहे. ओडिशा पहिल्या, गोवा दुसऱ्या, झारखंड तिसऱ्या, तर गुजरात चौथ्या स्थानावर आहे. देशातल्या विविध राज्यांच्या आर्थिक कामगिरीचं मूल्यमापन आणि तुलनात्मक विश्लेषण या अहवालात केलं जातं. त्यानुसार, आर्थिक व्यवस्थेत किरकोळ बदल करून महाराष्ट्रासह इतर काही राज्यांनी परिस्थिती स्थिर राखल्याचं अहवालात म्हटलं आहे. कर्जाची पातळी कमी ठेवून व्याजाचा बोजा नियंत्रणात ठेवल्यामुळे राज्याची अर्थव्यवस्था स्थिर राहिली, असंही अहवालात नमूद करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

राज्यासमोर अडचणी नाहीत असं नाही, मात्र अडचणीतून मार्ग काढण्याची क्षमता महाराष्ट्रात असून आर्थिक शिस्तीचं पालन करत यंदाचा अर्थसंकल्प मांडला आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत सांगितलं. ते अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर देत होते. राज्यावरचं कर्ज वाढलं हे खरं आहे मात्र

स्थूल राज्यांतर्गत उत्पादनाच्या २५ टक्क्यांच्या आत कर्ज असणं आवश्यक असतं, आणि महाराष्ट्रावरचं कर्ज १८ टक्के आहे. त्यामुळे अजून कर्ज घेण्याची महाराष्ट्राची क्षमता आहे असं ते म्हणाले.

**होल्ड - मुख्यमंत्री बाइट**

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही जगातली तिसाव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. राज्य दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत देशात पाचव्या क्रमांकावर आहे, मात्र राज्याच्या जीडीपी वाढीचा दर देशाच्या जीडीपी वाढीच्या दरापेक्षा जास्त आहे, असं ते म्हणाले.

भांडवली खर्च २ लाख कोटींपर्यंत पोहोचला आहे, ज्या तुलनेनं कर्ज वाढलंय त्याच्या कितीतरी पट अधिक भांडवली गुंतवणूक वाढली आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. सिंचन, ऊर्जा, सामाजिक न्याय अशा सर्व विभागांत प्रगती झाल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

जमीन मोजणी प्रक्रियेचा कालावधी ६० ते ९० दिवसांवरून ३० दिवसांवर आणला जाईल, अशी ग्वाही महसूलमंत्री चंद्रशेखऱ बावनकुळे यांनी आज विधानसभेत दिली. दीड हजार नवीन रोव्हर मशीनद्वारे मोजणी केली जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं. तसंच भूमी अभिलेख विभागातली रिक्त पदं भरण्यासाठी विशेष मोहीम राबवणार असून उप अधीक्षकाची पदं तीन महिन्यांच्या आत भरली जातील असं त्यांनी सांगितलं. त्याचप्रमाणे मराठवाड्यात प्रशासकीय सोयीसाठी नांदेड किंवा लातूर इथं दुसरं महसूल आयुक्तालय आणि उपसंचालक भूमी अभिलेख कार्यालय स्थापन करण्यात येणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

एसटी महामंडळात चालक आणि वाहक या पदांसाठी १७ हजार ६४२ कर्मचाऱ्यांच्या भर्तीचा प्रस्ताव विभागानं राज्य शासनाकडे पाठवला आहे. त्याला मंजुरी मिळाल्यानंतर ताबडतोब ही मेगाभर्ती होईल, अशी ग्वाही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासाला दिली.

<><><><><>

महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी सरकार पुढच्या अधिवेशनात विशेष विधेयक आणेल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज केली. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात त्या बोलत होत्या. राज्यात शेती कसणाऱ्या महिलांचं प्रमाण पुरुषांपेक्षा २० टक्क्यांनी जास्त असलं, तरी जमिनीचा सातबारा त्यांच्या नावावर नसल्यामुळे शेतीशी संबंधित विविध योजनांचे लाभ त्यांना मिळण्यात अडचणी येतात. त्या दूर करण्यासाठी राज्यात लिंगभाव संसाधन केंद्र सुरू करावं, अशी सूचना ज्येष्ठ कृषितज्ञ नित्या राव यांनी या कार्यक्रमात केली. त्यानुसार असं केंद्र राज्य सरकार लवकरच सुरू करेल, असं आश्वासन सुनेत्रा पवार यांनी दिलं. असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

आयआरसीटीसीनं रेल्वेस्थानकांवरच्या खानपानगृहांना मायक्रोवेव्ह आणि इंडक्शन वापरायच्या, तसंच प्रवाशांसाठी रेडी टू ईट खाद्यपदार्थांचा साठा ठेवायच्या सूचना दिल्या आहेत.

छत्रपती संभाजीनगरमध्ये काही हॉटेल चालकांनी चुलीवर स्वयंपाक करायला सुरुवात केली आहे. मुंबईतल्या काही वसतीगृहांनी परिस्थिती निवळेपर्यंत आहारात पोळ्या न देण्याचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

देशातल्या शेअर बाजारातली कालची तेजी औट घटकेची असल्याचं आज स्पष्ट झालं. सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये सकाळपासून सुरू झालेली घसरण दिवस अखेरपर्यंत वाढत गेली. बाजार बंद होताना सेन्सेक्स १ हजार ३४२ अंकांची घसरण नोंदवून ७६ हजार ८६४ अंकांवर बंद झाला. निफ्टीमध्ये ३९५ अंकांची घट झाली आणि हा निर्देशांक २३ हजार ८६७ अंकांवर स्थिरावला. कच्च्या तेलाच्या पुरवठ्यातले अडथळे, वाढणारी महागाई, अर्थव्यवस्थेवर होणारे दुष्परिणाम यासारख्या कारणांनी ही घसरण दिसून आल्याचं विश्लेषकांनी सांगितलं.

**<><><><>**

सुमारे चार दशकांनंतर लोकसभेच्या सभापतींविरोधात अविश्वास प्रस्ताव मांडला गेला आहे. सभागृह आणि संसदीय राजकारण, या दोन्हीसाठी ही अत्यंत खेदजनक बाब असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज लोकसभेत म्हणाले. सभापतींवरच्या अविश्वास प्रस्तावावरच्या चर्चेदरम्यान ते बोलत होते. सभापतींच्या प्रामाणिकपणाबाबत शंका घेण्याचा हा प्रकार दुर्दैवी आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितलं.

विरोधी पक्षातल्या काही नेत्यांचा अहंकार उफाळून आल्यानं हा प्रस्ताव आणला गेला, असा आरोप भाजपाचे रवी शंकर प्रसाद म्हणाले. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी परदेशी गेल्यावर जपून बोलावं, असा सल्ला त्यांनी दिला.

लोकसभेच्या सभापतींनी विरोधी पक्षनेत्याला बोलायची संधीच न देणं, विरोधकांना मुद्दे मांडण्यासाठी वेळ न देणं हे भारतीय लोकशाहीच्या इतिहासात प्रथमच घडत असल्याची टीका राहुल गांधी यांनी केली.

**<><><><>**

नागपूरच्या कोराडी वीज प्रकल्पात आज सकाळी टर्बाइनवर काम सुरु असताना पाईप लाईनमधून अचानक गरम वाफेचा प्रचंड फवारा बाहेर पडल्यानं

चार कर्मचारी जखमी झाले आहेत. यापैकी दोन कर्मचाऱ्यांना उपचारानंतर घरी सोडण्यात आलं असून दोन जणांवर अधिक उपचार सुरु आहेत.

<><><><><>

उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज मुंबईत ६५ व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनाचं उद्घाटन केलं. यावेळी वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव पुरस्कार सन २०२३-२४ साठी शिल्पकार किशोर ठाकूर यांना, २०२४-२५ चा पुरस्कार ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि.द.फडणीस यांना तर २०२५-२६ चा पुरस्कार चित्रकार पद्मश्री वासुदेव कामत यांना प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ कलाकार पुरस्कार, चित्रकार विलास शिंदे यांना देण्यात आला.

<><><><><>

गेल्या २४ तासात उत्तर कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात उल्लेखनीय तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी लक्षणीय वाढ झाली. राज्यात सर्वाधिक तापमान नंदूरबार इथं ४२ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सिअस नोंदलं गेलं.

येत्या दोन दिवसात विदर्भात येलो अलर्ट जारी केला असून तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील.

//<><><><><>//